**शासकीय वैद्यकीय / दंत महाविद्यालयांशी संलग्नित रुग्णालयातील मोफत वैद्यकीय सेवांसाठी लाभार्थी निश्चित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१६/प्र.क्र.३८८/प्रशा-२
९ वा मजला, नवीन गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, नवीन मंत्रालय, मुंबई - ४०० ००१.
तारीख: ०४ जुलै, २०१७.

वाचा:- १) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग,
क्र.जिरुफी-१०००/प्र.क्र.९०/२०००/आरोग्य-३, दिनांक १०.०७.२००१.
२) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
क्र.एमआयएस-२००१/१२५६/प्र.क्र.१९८/२००१/प्रशासन-२, दिनांक १८.०१.२००२.
३) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
क्र.विसयो-२०१०/प्र.क्र.१७५/विसयो-२, दिनांक २६.१०.२०१०.
४) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
क्र.एमआयएस-२००६/३०५/सीआर-३३/०६/प्रशासन-२ दिनांक ३०.१२.२०१०.
५) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग,
क्र.रागांयो-२०१६/प्र.क्र.६४/आरोग्य-६, दिनांक ०४.०८.२०१६.

प्रस्तावना:

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या संदर्भ क्रमांक (४) येथील शासन निर्णयाद्वारे शासकीय वैद्यकीय / दंत महाविद्यालये संलग्नीत रुग्णालयांतील औषधोपचारांसाठी तसेच, रुग्णांना पुरविण्यात येणाऱ्या विविध सेवा-सुविधांसाठी आकारण्यात येणारे शुल्कांचे दर निश्चित करण्यात आले आहेत. सदर शासन निर्णयानुसार ज्यांचे वार्षिक उत्पन्न रु.२०,०००/- किंवा त्याहून कमी आहे अशांना किंवा अन्न व नागरी पुरवठा विभागाने वितरित केलेल्या पिवळ्या रेशनकार्ड धारक दारिद्र्य रेषेखालील रुग्णांना मोफत आरोग्य सुविधा पुरविण्यात येतात. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, दिनांक २६ ऑक्टोबर, २०१० अन्वये सामाजिक अर्थसहाय्य योजनेतंर्गत देण्यात येणारे अनुदान मिळण्यासाठी लाभार्थी निश्चित करण्यात आले आहेत. याशिवाय शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, दिनांक ४ ऑगस्ट, २०१६ अन्वये महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेतंर्गत (पूर्वीची राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना)

Scanned by CamScanner

पात्र असलेले लाभार्थी निश्चित करण्यात आले आहेत. राज्याच्या सामाजिक अर्थसहाय्य योजनेतंर्गत व महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेतंर्गत पात्र असलेले लाभार्थी विचारात घेऊन शासकीय वैद्यकीय / दंत महाविद्यालय संलग्नीत रुग्णालयांकडून दिल्या जाणाऱ्या मोफत आरोग्य सुविधांचा लाभ अधिकाधिक नागरीकांपर्यंत तसेच समाजातील वंचित, पिडीत, दुर्धर आजारग्रस्त, निराधार व्यक्ती, स्वातंत्र्यसैनिक यांच्यापर्यंत पोहचावा या हेतूने लाभार्थ्यांच्या संख्येंमध्ये वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती, त्यानुसार शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय:

शासकीय वैद्यकीय / दंत महाविद्यालय संलग्नीत रुग्णालयांकडून दिल्या जाणाऱ्या मोफत आरोग्य सुविधांचा लाभ सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक १० जुलै, २००१ च्या शासननिर्णयातील परिशिष्ट-अ मध्ये नमूद व्यक्तींबरोबरच खालील लाभार्थ्यांना पुरविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१) दारिद्र्य रेषेखालील (बीपीएल) मर्यादेतील सर्व व्यक्ती. (अशा व्यक्ती/कुटुंब ज्यांचा दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या यादीमध्ये समावेश असल्याबाबतचा सक्षम प्राधिकाऱ्यांनी दाखला आहे.)

२) शासनाच्या अंत्योदय अन्न योजनेतील लाभार्थी, अन्नपूर्णा योजना शिधापत्रिकाधारक.

३) स्वातंत्र्य सैनिक, बॉम्बस्फोट दुर्घटनाग्रस्त, दहशतवादी हल्ले दुर्घटनाग्रस्त व्यक्ती.

४) क्षयरोग, पक्षाघात, प्रमस्तिष्कघात, एड्स (एचआयव्ही +ve), कुष्टरोग, सिकलसेल रुग्ण मानसिक असमर्थ (मेंटल रिटायर्ड), हिमोफिलिया, थेलेसीमिया रुग्ण व सार्वजनिक आरोग्य विभागाने निश्चित केलेल्या दुर्धर आजारामुळे स्वत:चा चरितार्थ चालवू न शकणारे स्त्री, पुरुष व बालके.

५) निराधार पुरुष / महिला / तृतीयपंथी, निराधार विधवा, घटस्फोट प्रक्रियेतील व घटस्फोट झालेल्या परंतु पोटगी न मिळणाऱ्या किंवा कुटुंबाचे उत्पन्न प्रतिवर्षी रुपये २१,०००/- पर्यंतच्या उत्पन्न मर्यादेपेक्षा कमी पोटगी मिळणाऱ्या महिला, परित्यक्त्या, देवदासी, अत्याचारित महिला व वेश्या व्यवसायातून मुक्त केलेल्या महिला.

Scanned by CamScanner

६) आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांचे कुटूंब (कुटंबाचे उत्पन्न प्रतिवर्षी रुपये २१,०००/- पर्यंत) किंवा कुटुंबाचे नाव दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाच्या यादीत समाविष्ट असल्यास असे कुटुंब.

७) अनाथ मुले (१८ वर्षाखालील).

८) सामाजिक न्याय विभागाच्या सामाजिक अर्थसहाय्य योजनेंतर्गत असलेल्या श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतील वय वर्षे ६५ व त्यावरील लाभार्थी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( सुरेश व.पाटील )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राज भवन, वाळकेश्वर मार्ग, मलबार हिल, मुंबई - ४०० ०३५.
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.मंत्री, (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंवई.
४) मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई.
५) मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधान परिषद, मुंबई.
६) मा.राज्यमंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
८) सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
९) महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
१०) सर्व विभागीय आयुक्त.
११) सर्व जिल्हाधिकारी.
१२) सर्व सह सचिव / उप सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१३) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंवई.
१४) सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय / दंत महाविद्यालये व संलग्नित रुग्णालये.
१५) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१६) प्रसिध्दी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई (प्रसिध्दीसाठी).
१७) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१८) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
१९) सर्व अवर सचिव / कक्ष अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंवई.



Scanned by CamScanner